दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शुक्रवार दि.२० मार्च २०२६ 9422660077 ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २०२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Friday 20 March 2026 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 202 ● Pages 4 ● Rate 4 Rs

### सुनेत्रा पवारांविरोधात काँग्रेसचे पदाधिकारी मैदानात

**मुंबई**–बारामतीसह राज्यातील दोन जागांवरील विधानसभेच्या पोटनिवडणुकांबाबत महाविकास आघाडीत अद्याप अंतिम निर्णय झालेला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी महत्त्वाचे विधान करत, शरद पवार गटाने निवडणूक लढवली नाही तर काँग्रेस त्या जागांवर उमेदवार देण्याचा विचार करेल, असे सांगितले आहे. बारामती पोटनिवडणुकीबाबत सुप्रिया सुळे यांनी घेतलेल्या न लढण्याच्या भूमिकेशी काँग्रेस सहमत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या मुद्द्यावर महाविकास आघाडीत अधिकृत चर्चा अद्याप झालेली नसून, परस्पर चर्चेनंतरच अंतिम निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी नमूद केले.दरम्यान, काँग्रेसच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी बारामतीत निवडणूक लढवण्याची तयारी दर्शवली आहे. तुतारीवर उमेदवार दिला नाही, तर आम्ही उमेदवार देऊ, असा थेट इशारा त्यांनी दिला आहे. बारामतीत राष्ट्रवादीमुळे काँग्रेस वाढली नाही, अशी नाराजीही उघडपणे व्यक्त करण्यात आली.

# आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे मजूर व महिला सहकारी संस्थांना मिळणार बळ,मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक

## मजूर संस्थांसोबतच प्राधान्याने महिला सहकारी संस्थांना कामे देण्यासाठी शासन सकारात्मक राज्यमंत्र्यानी दिली ग्वाही

### कामांचे न्याय्य वाटप,ऑनलाइन नोंदणी व स्थानिक रोजगारनिर्मिती वाढवण्यावर भर;आ.मुनगंटीवार यांच्या सूचनेनुसार ५ सदस्यीय समिती गठित

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे राज्यातील मजूर सहकारी संस्था सोबतच प्राधान्याने महिला सहकारी संस्थांना शासनाच्या विविध कामांमध्ये अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी पुढाकार घेत मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक आयोजित केली. सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत सहकार क्षेत्र अधिक सक्षम करणे, स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती वाढवणे तसेच कामांचे पारदर्शक व न्याय्य वाटप सुनिश्चित करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी या विषयाचा सखोल अभ्यास करून व्यवहार्य धोरण निश्चित करण्यासाठी ५ सदस्यीय समिती गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला.बैठकीदरम्यान ना. पंकज भोयर यांनी आ. सुधीर मुनगंटीवार यांचा सत्कार केला. या बैठकीस सहकार विभागाचे सचिव, उपसचिव नितीन गायकवाड, अप्पर निबंधक डॉ. पी. एल. खंडागळे, जिल्हा उपनिबंधक तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे सहकार आयुक्त दीपक तावरे यांनीही सहभाग नोंदवला.



बैठकीत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मजूर सहकारी संस्था सोबतच प्राधान्याने महिला सहकारी संस्थांना शासनाच्या विविध कामांमध्ये संधी देण्याची ठाम भूमिका मांडली. या दोन्ही संस्थांना अधिक कामे मिळाल्यास त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील आणि ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर स्थानिक रोजगारनिर्मिती होईल, असे त्यांनी अधोरेखित केले. तसेच सहकाराच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी महिला सहकारी संस्थांना प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.आ. मुनगंटीवार यांच्या या भूमिकेला प्रतिसाद देत सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी मजूर सहकारी संस्था सोबतच यापुढे प्राधान्याने महिला सहकारी संस्थांना देण्याबाबत शासन सकारात्मक असल्याची ग्वाही दिली. राज्यात विविध यंत्रणांमार्फत १० लाख रुपयांपर्यंतची कामे, ई-निविदा पद्धतीद्वारे मिळणारी कामे तसेच जिल्हा परिषद स्तरावरील कामे मजूर सहकारी संस्थांना दिली जातात. या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि समन्वय आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.यावेळी आ. मुनगंटीवार यांनी कामांचे वाटप अधिक पारदर्शक करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्याची गरज अधोरेखित केली. त्यानुसार ई-निविदा पद्धतीद्वारे व जिल्हा परिषदेमार्फत मजूर संस्थांना देण्यात आलेल्या कामांची माहिती जिल्हा उपनिबंधक स्तरावर संकलित करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच सर्व कामांची ऑनलाइन नोंद अनिवार्य करण्यासाठी स्वतंत्र पोर्टल विकसित करण्याबाबतही सूचना करण्यात आल्या. सदर विषयाचा सखोल अभ्यास करून व्यवहार्य धोरण निश्चित करण्यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या सूचनेनुसार ५ सदस्यीय समिती गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला. यावर सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी तात्काळ सकारात्मक प्रतिसाद देत समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले. समितीने लवकरात लवकर अहवाल सादर करावा आणि त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.



# रमजान ईद निमित्त तृतीयपंथीयांना ‘रमजान मुबारक किट’ वाटप

## राजयोग फाउंडेशन व आश्रय सेवा केंद्राच्या वतीने संवेदनशील उपक्रम

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

पवित्र रमजान ईद सणाच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जपत राजयोग फाउंडेशन आणि आश्रय सेवा केंद्र व पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने तृतीयपंथीय बांधवांना ‘रमजान मुबारक किट’ देऊन ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या. समाजातील प्रत्येक घटकाला सणाचा आनंद मिळावा आणि सर्वसमावेशकतेचा संदेश समाजात पोहोचावा या उदात्त हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला. बीड येथील समर्थ राजयोगच्या मुख्य कार्यालयात बुधवार दिनांक १८ मार्च २०२६ रोजी दुपारी २ वाजता राजयोग फाउंडेशन यांच्या पुढाकारातून आश्रय सेवा केंद्र आणि पत्रकार संघ यांच्या संकल्पनेतून ईद मुबारक किट वाटपाचा स्तुत्य उपक्रम मान्यवरांच्या



उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी राजकीय फाउंडेशनचे अध्यक्ष नगरसेवक शुभम धूत, पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी,आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा शेख आयेशा यांच्यासह नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्धिकी, डॉ.वैभव कोठेकर, राजदिप धुत, सागर वाहुळ, मेघराज जगदाळे, सुशांत राऊत, संकेत करवा, वैभव घुमरे, सय्यद ताहेर, राहुल बादाडे, अभिजीत आव्हाड, ओंकार बोबडे यांच्यासह राजयोग फाऊंडेशनचे इतर सदस्यउपस्थित होते. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अनेकदा दूर राहणाऱ्या तृतीयपंथीय बांधवांनाही सणाचा आनंद साजरा करता यावा, त्यांना आपुलकीची जाणीव व्हावी आणि समाजात समानतेचा संदेश जावा, या उद्देशाने या किटचे वितरण करण्यात आले असे मुख्य आयोजक राजयोग फाउंडेशनचे अध्यक्ष तथा नगरसेवक शुभम धूत यांनी स्पष्ट केले. तर रमजान आणि ईद हा संयम, दया, प्रेम आणि बंधुत्वाचा संदेश देणारा सण आहे. समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने आणि आत्मीयतेने वागणूक देणे हीच खरी मानवता असल्याचे पत्रकार वैभव स्वामी यांनी नमूद केले. राजयोग फाउंडेशन आणि आश्रय सेवा केंद्र व पत्रकार संघ यांनी राबविलेल्या या उपक्रमामुळे तृतीयपंथीय बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. समाजात समता, आपुलकी आणि परस्पर सहकार्य वाढविणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी मनापासून कौतुक केले. रमजान ईदच्या पवित्र पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम समाजात सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश देणारा आदर्श उपक्रम ठरत आहे.

# धारुरच्या जनता दरबारात जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या कडे उपसरपंच तुषार खुळे यांनी मांडली कोळ पिंपरी रस्त्याची कैफियत



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

कोळ पिंपरी ता.धारूर जि.बीड येथील कोळ पिंपरी बस स्टँड राष्ट्रीय महामार्ग २३२ ते कोळ पिंपरी गाव हा १.२किमी असुन मागील अनेक वर्षांपासून तो नादुरुस्त व अनेक खाच खळगे असलेला झाला आहे. याच रस्त्यावर जिल्हा परिषद शाळा,माध्यमिक विद्यालय असल्याने विद्यार्थ्यांना दररोजच्या त्रासाला सामोरे जावे लागते.तसेच गर्भवती महिला व रुग्णाला धारुर ला नेण्यासाठी हा रस्ता असुन अडचण नसुन खोळंबा झाला आहे.या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी उपसरपंच तुषार विजयकुमार खुळे यांनी कार्यकारी अभियंता, बांधकाम विभागास तीन महिन्यांपूर्वी निवेदन दिले होते.आज धारुर येथील जनता दरबारात ही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनाही निवेदन दिले.या रस्त्यासाठी लवकरच योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन या वेळी उपसरपंच तुषार खुळे यांना जिल्हाधिकारी यांनी दिले आहे.

# हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत भगवान श्रीकृष्ण मंदिरांचे भुमीपुजन संपन्न

## ढोक महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत भगवान श्रीकृष्ण मंदिरांचे भुमीपुजन श्री.१००८ स्वामी चिन्मय पुरीजी महाराज व भागवत भुषण ह.भ.प.केशव महाराज शास्त्री यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

ह.भ.प.रामराव महाराज

ढोक यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता झाली.यावेळी त्यांनी चुराचुराकर माखन खाया या अभंगावर काल्याचे किर्तन केले.यावेळी अभंगाचे निरुपण करताना ह.भ.प.रामराव महाराज ढोक यांनी सांगितले की,मानवी जन्म भाग्याने मिळतो.तो भारत देशात मिळावा तसेच महाराष्ट्रात मिळावा हे परमभाग्य आहे.देव,भक्त व नाम जिथे असेल तेथे काला होतो म्हणून महाराष्ट्रात काला होतो.देवाच्या प्रसाद अधिकारी मानवाला मिळतो म्हणून काला मिळतो असे त्यांनी सांगितले.स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे माझ्या



किर्तनाला आवर्जून येत होते.ज्ञानेश्वर माऊली व मुंडे साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त आजही किर्तन सेवा होत आहे. भगवान श्रीकृष्ण मंदिरांचे संपूर्ण स्टील राजाभाऊ घुले व विष्णु भाऊ घुले पुरवणार आहेत तसेच काल्याची पंगतही त्यांनी घेतली आहे. महा विष्णुयज्ञात पवित्र झालेली वीट घरी २०० देऊन भाविकांनी घरी न्यावी या जमा झालेल्या रक्कमेतुन वीटा मंदिर बांधकामासाठी वापरण्यात येणार आहेत असे ह.भ.प.केशव महाराज शास्त्री यांनी सांगितले.आचरण रामाचे करावे तर चरीत्र कृष्णाचे उच्चारावे मागणी केल्या नंतर मिळते ते आश्वासन व न मागता मिळतो तो आशिर्वाद असे ह.भ.प. रामराव महाराज ढोक यांनी सांगितले.बाल श्रीकृष्ण चरित्र सांगुन काल्याच्या किर्तनाची सांगता झाली.यावेळी पावनधाम संस्थानचे महंत ह.भ.प.महादेव महाराज बोराडे शास्त्री, रमेशराव आडसकर, युवा नेते रणजीत भैय्या आडसकर,सौरव भैय्या सोनवणे,रमाकांत बापू मुंडे,सुधाकर बापु लांब, अनंतराव घुले,श्रीकांत घुले,शिवराम घुले यांच्या सह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. ह.भ.प.केशव महाराज शास्त्री यांनी सप्ताह यशस्वी केल्याबद्दल सर्वांचे आभार मानले आहेत.महाप्रसादाने कार्यक्रम संपन्न झाला.


# महाडमध्ये आज काँग्रेसचा ’चवदार तळे सत्याग्रह समता शताब्दी वर्ष’ सोहळ्याचा शुभारंभ कार्यक्रम

## हर्षवर्धन सपकाळ, तुषार गांधी, उल्का महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**


राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २० मार्च १९२७ या दिवशी महाड येथे चवदार तळ्यावर सत्याग्रह केला होता. या ऐतिहासिक घटनेचे औचित्य साधत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने उद्या शुक्रवार दिनांक २० मार्च रोजी महाड जि. रायगड येथे ’चवदार तळे सत्याग्रह समता शताब्दी वर्ष’ सोहळा शुभारंभ कार्यक्रम आयोजित केला आहे.

आज या काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, महात्मा गांधी यांचे पणतु ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तुषार गांधी, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन यांच्यासह अनेक मान्यवर नेते व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे.आज संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवरच काँग्रेस पक्षाने कार्य केले आहे. काँग्रेस पक्षाने सत्तेचा वापर हा नेहमीच महिला, वंचित, शोषित, दलित, आदिवासी, बहुजनांच्या कल्याणासाठी केला आहे. ज्या ऐतिहासिक घटनेने बाबासाहेबांनी क्रांतीचा पाया रचला त्या क्रांतीकारी घटनेची शताब्दी काँग्रेस पक्षातर्फे साजरी करून बाबासाहेबांना व त्यांच्या क्रांतीला अभिवादन केले जाणार आहे. २० मार्च २०२६ ते २० मार्च २०२७ हे वर्ष काँग्रेस पक्षातर्फे चवदार तळे सत्याग्रह समता शताब्दी वर्ष म्हणून साजरे केले जाणार आहे. सामाजिक न्यायाशिवाय समता प्रस्थापित होणार नाही आणि समतेशिवाय डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत लोकशाही प्रत्यक्षात अवतरणार नाही. हे लक्षात घेऊन सामाजिक न्यायातून समतेकडे ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून हे शताब्दी वर्ष साजरे करण्यात येणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने दिली आहे.



# संपादकीय

## एकदाची भरती करा!



राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालये यांमधील प्राध्यापकांच्या रिक्त पदांपैकी सहा हजारांहून अधिक पदे भरण्यास मान्यता दिल्याची उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधान परिषदेत सांगितलेली माहिती नवीन नाही. राज्यातील उच्च शिक्षणाच्या संस्थांमध्ये शिक्षकांच्या एकूण रिक्त जागांची संख्या अकरा हजारांहून अधिक आहे.उच्च शिक्षणसंस्थांच्या राष्ट्रीय क्रमवारीत राज्यातील विद्यापीठांची आणि महाविद्यालयांची होत असलेली घसरण याचेच द्योतक म्हणावे लागेल. ही क्रमवारी जाहीर झाली, की उच्च शिक्षणाच्या दुरवस्थेची चर्चा सुरू होते आणि प्राध्यापकांच्या रिक्त जागा भरणार असल्याची घोषणा होते. नंतर फार काही होत नाही. मात्र, आता काही रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे हे खरे. त्याचा तपशील मंत्रिमहोदयांनी विधिमंडळात दिलेला आहे.राज्यात बाराशेहून अधिक अनुदानित महाविद्यालये असून, त्यांमधील शिक्षकांच्या रिक्त पदांची संख्या जवळ जवळ बारा हजार आहे. त्यांपैकी ५४०० पदे भरली जातील. याशिवाय विद्यापीठांतील प्राध्यापकांच्या रिक्त पदांपैकी सातशे पदे भरली जातील. ही प्रक्रिया कधी संपणार हे स्पष्ट नाही. तातडीने ती भरली जाण्याची शक्यता कमीच. कारण दीर्घ काळानंतर पदभरती होत असल्याने पात्र उमेदवारांची संख्या मोठी असणार. एका पदासाठी शंभर इच्छुक असे प्रमाण असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे अर्ज भरणे, गुणवत्ता यादी, मुलाखती या पारंपरिक प्रक्रियांखेरीज आरोप, प्रत्यारोप, रुसवे-फुगवे, नाराजी आणि ‘अर्थ’पूर्ण व्यवहार यांमुळे भरती लांबण्याची शक्यता अधिक.मुळात रिक्त पदांची संख्या इतकी वाढण्याला सरकारचा उच्च शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कारणीभूत आहे. सरकार कोणत्याही पक्षाचे असले, तरी उच्च शिक्षणाकडे एक ओझे म्हणून पाहिले जात असल्याचा गेल्या २५-३० वर्षांचा अनुभव आहे. याच काळात देशात आणि राज्यात खासगी शिक्षणसंस्थांची भरभराट होत गेली. उत्तम करिअरची संधी देणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांत खासगी महाविद्यालयांना आणि विद्यापीठांना अधिक रस होता; आता तर भाषा आणि मानव्यविद्या शाखांचे ‘ लिबरल आर्ट्स ’ असे नामकरण करून ते अभ्यासक्रमही व्यावसायिक शाखांप्रमाणे राबविले जात आहेत. खासगी संस्थांचा असा विस्तार होऊ लागल्यावर खुद्द सरकारमधील मंडळीच सार्वजनिक विद्यापीठांना नाके मुरडू लागली. या विद्यापीठांसाठी आर्थिक तरतूद करताना खळखळ केली जाऊ लागली. परिणामी नवीन भरती जवळपास थांबून रिक्त पदे वाढतच गेली.सार्वजनिक विद्यापीठांची गुणवत्ता ढासळण्याचे हे एक कारण. अर्थात इतरही कारणे आहेत. प्राध्यापकांचे विषय ज्ञान, अध्यापन कौशल्य, संशोधन आदींचा मुद्दाही आहे. रिक्त जागा न भरल्यामुळे हंगामी पद्धतीने शिक्षक नेमले जाऊ लागले. अन्य पर्याय नसल्याने किंवा कधीतरी कायम होऊ, या आशेने अनेक तरुण-तरुणी अल्प वेतनावर काम करू लागले. दुसरीकडे खासगी संस्थांमध्ये काही मूठभर नावाजलेल्या प्राध्यापकांना आकर्षक वेतन देताना इतरांची मात्र कमी पगारावर बोळवण करण्याची पद्धत सुरू झाली. अनुदानित महाविद्यालयातील पदे भरताना अनेक संस्था ‘अर्थ’पूर्ण व्यवहार करतात हे उघड सत्य आहे. प्राध्यापकांच्या एका पदासाठी एक कोटी रुपयांपर्यंत भ्रष्टाचार होत असल्याची कुजबूज आहे. हे लोण आता विद्यापीठांपर्यंत पोहोचल्याचेही सांगितले जाते.या पार्श्वभूमीवर आता प्राध्यापक भरती होणार आहे. पात्र उमेदवारांना संधी मिळण्यासाठी ही भरती प्रक्रिया पारदर्शकतेने व्हायला हवी. भरतीसाठी ६०-२०-२० हे सूत्र अवलंबणार असल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले आहे. शैक्षणिक पात्रतेस ६० गुण आणि अध्यापन कौशल्ये व मुलाखत यांसाठी प्रत्येकी वीस गुण दिले जातील. त्याचबरोबर विद्यापीठांत सर्व विषयांसाठी एकच गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. ही पद्धत अधिक काटेकोर आणि पारदर्शक होण्यासाठी तज्ज्ञांची मदत घ्यायला हवी. विषयज्ञान, अध्यापन कौशल्ये आणि संशोधन या तिन्ही बाबींत उत्तम असलेले उमेदवार निवडले जातील हे पाहायला हवे. खासगी संस्थांचा विस्तार झाला असला, तरी सर्वसामान्यांना अनुदानित महाविद्यालये आणि सरकारी विद्यापीठांखेरीज पर्याय नाही. त्यामुळे त्यांची जबाबदारी घेतानाच तेथील गुणवत्ता उंचावण्यासाठी सरकारने कटिबद्धता दाखवावी आणि त्याची सुरुवात प्राध्यापक भरती प्रक्रिया वेगवान करून व्हावी.

# महाड चवदार तळे सत्याग्रह समतेच्या हक्कासाठीची जलक्रांती

भारतीय समाजाच्या इतिहासात काही घटना अशा आहेत की ज्यांनी केवळ एका प्रश्नाचे निराकरण केले नाही, तर संपूर्ण सामाजिक व्यवस्थेच्या पाया हलवून टाकला. २० मार्च १९२७ रोजी घडलेला महाड चवदार तळे सत्याग्रह हा असा एक ऐतिहासिक टप्पा आहे, ज्याने भारतीय समाजातील अस्पृश्यतेच्या अमानुष प्रथेला उघडपणे आव्हान दिले आणि समानतेच्या लढ्याला एक नवीन दिशा दिली. हा सत्याग्रह पाण्यासारख्या मूलभूत हक्कासाठी होता, परंतु त्यामागे असलेली भावना ही मानवी सन्मान, स्वाभिमान आणि न्याय यांची होती. त्यामुळेच हा प्रसंग भारतीय सामाजिक क्रांतीच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.ब्रिटिशकालीन भारतात जातिव्यवस्था अत्यंत कठोर स्वरूपात अस्तित्वात होती. समाजातील तथाकथित उच्चवर्णीयांनी स्वतःला श्रेष्ठ समजत खालच्या जातींना सर्व प्रकारच्या मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवले होते. अस्पृश्य मानल्या गेलेल्या लोकांना सार्वजनिक ठिकाणी जाण्याची, विहिरी किंवा तलावाचे पाणी वापरण्याची, शाळांमध्ये शिक्षण घेण्याची किंवा मंदिरात प्रवेश करण्याची परवानगी नव्हती. पाणी ही जरी सर्वांसाठी समान असणारी नैसर्गिक संपत्ती असली तरीही त्या काळात त्यावरही जातीय बंधने घालण्यात आली होती. त्यामुळे पाण्याचा प्रश्न हा केवळ जीवनावश्यक गरजेचा प्रश्न नव्हता, तर तो सामाजिक प्रतिष्ठेचा आणि मानवी अस्तित्वाचा प्रश्न होता.याच अन्यायकारक परिस्थितीविरुद्ध आवाज उठवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुढाकार घेतला. त्यांनी अस्पृश्य समाजातील लोकांना शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीच्या माध्यमातून आपल्या हक्कांसाठी लढण्याचे आवाहन केले. त्यांच्या नेतृत्वाखाली समाजातील वंचित घटकांनी स्वतःच्या हक्कांसाठी उभे राहण्याचा निर्धार केला. महाड येथे असलेले चवदार तळे हे सार्वजनिक जलस्रोत असूनही अस्पृश्यांना त्याचा वापर करण्यास मनाई होती. १९२४ मध्ये महाड नगरपालिकेने सर्वांना या तळ्याचे पाणी वापरण्याचा अधिकार देणारा ठराव मंजूर केला होता, परंतु प्रत्यक्षात हा ठराव अंमलात आणला गेला नाही.या पार्श्वभूमीवर १९ आणि २० मार्च १९२७रोजी महाड येथे एक ऐतिहासिक परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेला हजारो बहिष्कृत बांधव उपस्थित होते. या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले भाषण अत्यंत प्रभावी होते. त्यांनी उपस्थितांना आत्मसन्मानाची जाणीव करून दिली आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा दिली. त्यांनी स्पष्ट केले की, ‘आपण माणूस आहोत आणि माणूस म्हणून जगण्याचा आपला पूर्ण हक्क आहे.’ त्यांच्या या विचारांनी उपस्थितांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण झाला.२० मार्च १९२७ रोजी हजारो लोकांनी एकत्र येऊन चवदार तळ्याकडे मोर्चा काढला.



त्यांनी तळ्याचे पाणी प्राशन करून आपल्या हक्काची घोषणा केली. हा प्रसंग भारतीय सामाजिक इतिहासातील एक क्रांतिकारी क्षण होता. या कृतीमुळे अस्पृश्य समाजाने आपल्या हक्कांसाठी प्रत्यक्ष कृती केली आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य दाखवले. हा सत्याग्रह म्हणजे केवळ एक आंदोलन नव्हते, तर तो सामाजिक परिवर्तनाचा प्रारंभ होता.या घटनेनंतर समाजातील उच्चवर्णीय घटकांनी तीव्र विरोध दर्शवला. त्यांनी या कृतीचा निषेध केला आणि तळ्याचे ‘शुद्धीकरण’ करण्याचा प्रयत्न केला. या कृतीतून त्या काळातील सामाजिक मानसिकतेचे वास्तव स्पष्ट होते. तथापि, या विरोधामुळे चळवळीची तीव्रता कमी झाली नाही. उलट या घटनेने अस्पृश्य समाजात आत्मविश्वास वाढवला आणि त्यांनी आपल्या हक्कांसाठी लढण्याचा निर्धार अधिक दृढ केला.महाड चवदार तळे सत्याग्रहाचे महत्त्व केवळ त्या काळापुरते मर्यादित नाही. या आंदोलनाने भारतीय समाजात समतेच्या विचारांना चालना दिली. या चळवळीच्या पुढील टप्प्यात २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृतीचे दहन करण्यात आले, ज्यामुळे सामाजिक विषमतेच्या विचारसरणीविरुद्ध एक ठोस संदेश दिला गेला. या घटनांनी भारतीय समाजात परिवर्तनाची प्रक्रिया सुरू केली आणि सामाजिक न्यायाच्या चळवळीला बळ मिळाले.महाड सत्याग्रह हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. कारण या चळवळीने केवळ राजकीय स्वातंत्र्याची मागणी केली नाही, तर सामाजिक स्वातंत्र्याचीही गरज अधोरेखित केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्पष्ट केले की, ‘राजकीय स्वातंत्र्याला काही अर्थ नाही, जर समाजात समानता आणि न्याय नसेल.’ त्यांच्या या विचारांचा प्रभाव पुढे भारतीय संविधानाच्या निर्मितीत दिसून येतो.महाड चवदार तळे सत्याग्रहाने समाजातील वंचित घटकांमध्ये आत्मसन्मानाची भावना निर्माण केली. त्यांनी स्वतःला हीन समजण्याऐवजी स्वाभिमानाने जगण्याचा निर्धार केला. शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक परिवर्तनासाठी प्रयत्न सुरू केले. या चळवळीने समाजातील इतर घटकांनाही विचार करण्यास भाग पाडले.आजच्या काळातही महाड सत्याग्रहाची प्रासंगिकता तितकीच आहे. जरी कायद्याने अस्पृश्यता नष्ट केली असली तरी सामाजिक पातळीवर अजूनही भेदभावाच्या घटना घडतात. त्यामुळे या ऐतिहासिक घटनेचे स्मरण करून आपण सामाजिक समतेसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. शिक्षण, जागरूकता आणि सामाजिक बांधिलकी यांच्या माध्यमातून आपण हा लढा पुढे नेऊ शकतो.महाड चवदार तळे सत्याग्रह हा केवळ एक ऐतिहासिक प्रसंग नाही, तर तो मानवी हक्कांसाठीच्या संघर्षाची प्रेरणादायी कथा आहे. या आंदोलनाने आपल्याला शिकवले की, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक घटकाला समान हक्क मिळवून देण्यासाठी सतत प्रयत्न करणे हीच खरी मानवता आहे.आज, २० मार्च या ऐतिहासिक क्रांती दिनानिमित्त आपण महाड चवदार तळे सत्याग्रह या घटनेचे स्मरण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला अभिवादन करतो. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन आपण समतेच्या, न्यायाच्या आणि बंधुत्वाच्या मूल्यांचे पालन करणे आवश्यक आहे.महाडचा हा सत्याग्रह भारतीय सामाजिक क्रांतीचा दीपस्तंभ आहे. त्याने आपल्याला दाखवून दिले की, बदल घडवून आणण्यासाठी धैर्य, संघटन आणि नेतृत्व आवश्यक असते. या घटनेचे स्मरण म्हणजे केवळ इतिहासाचे पुनरावलोकन नाही, तर भविष्यासाठी मार्गदर्शन आहे. चला, या ऐतिहासिक दिवसाचे औचित्य साधून आपण सर्वजण सामाजिक समतेसाठी कटिबद्ध होऊया आणि एक न्याय्य, समतावादी समाज निर्माण करूया.

**-डॉ. राजेंद्र बगाटे (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),**
ईमेल - bagate.rajendra5gmail.com

# केजच्या वैभवात पडणार भर; शिक्षक कॉलनीत उभारले जाणार १ कोटींचे भव्य 'नमो उद्यान'!

## अंतर्गत रस्ते आणि रोषणाईसह आधुनिक सुविधांनी सज्ज

## टेंडर प्रक्रिया पूर्ण होऊन कामाला लवकरच सुरुवात

दैनिक वादळ वार्ता
**प्रकाश मुंडे । केज**

केज शहरातील श्री दत्त जिल्हा परिषद कर्मचारी को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी (शिक्षक कॉलनी) भागातील रहिवाशांसाठी एक आनंदाची बातमी आहे. सर्वे नं. १८/३ मधील सोसायटीच्या सुमारे २३ गुंठे मोकळ्या जागेत (जशिप डरलिश) तब्बल १ कोटी रुपये खर्च करून अत्याधुनिक 'नमो उद्यान' उभारले जाणार आहे. या उद्यानासह अंतर्गत रस्ते आणि विद्युत रोषणाईच्या कामाची टेंडर प्रक्रिया नुकतीच पूर्ण झाली असून, लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

**बड्या कंपन्यांची टेंडरसाठी चढाओढ**

या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी एकूण १५ नामांकित कंत्राटदारांनी टेंडर भरले असून, यामध्ये अनेक मोठ्या कंपन्यांनी रस दाखवला आहे. पारदर्शक टेंडर प्रक्रियेनंतर आता हे काम प्रगतीपथावर येणार आहे. या उद्यानामुळे केवळ शिक्षक कॉलनीच नव्हे, तर संपूर्ण केज शहराच्या सौंदर्यात मोठी भर पडणार आहे.



**सर्व वयोगटांसाठी हक्काचे विरंगुळा केंद्र**

या उद्यानात लहान मुलांसाठी खेळणी, ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था आणि महिलांसाठी फिरण्यासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध होणार आहे. धावपळीच्या जीवनात निवांत क्षण घालवण्यासाठी हे एक उत्तम ठिकाण ठरेल. तसेच कॉलनीतील अंतर्गत रस्त्यांच्या कामामुळे रहिवाशांची मोठी सोय होणार आहे.

**प्रा. ईश्वर मुंडे यांच्या प्रयत्नांना यश**

श्री दत्त सोसायटीचे सभासद प्रा. ईश्वर मुंडे यांच्या विशेष पुढाकारातून आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून हा १ कोटी रुपयांचा भरीव निधी उपलब्ध झाला आहे. या विकासकामाबद्दल सोसायटीचे सभासद पत्रकार प्रकाश मुंडे, काकड सर, अंधारे सर, स्वामी साहेब, कराड साहेब, घुले सर, ढाकणे सर, बडे सर, मुंडे सर, दिवार साहेब, तांबडे सर, गोविंद काळे आंधळे फौजी , दत्ता धस, भगवान केदार, पिटू भैय्या तांदळे , खय्युम भाई शेख, बाबासाहेब केदार सर, रामहरी घुले, रोहित मुंडे, वैभव केंद्रे, संदीप भुतडा, आमर केजकर, डॉ विजयकुमार धस, अमोल ठोंबरे, योगेश हांगे, नवनाथ घुले, अमोल मुंडे, गोटू भैया पाळवदे, राजेभाऊ मुळे, राजेश गवळी,आमर साबळे, अमोल घुले, अमोल धस, राजसाहेब ढाकणे, महादेव जाधवर यांनी प्रा.इश्वर मुंडे व नगरपंचायतीचे विशेष आभार मानले आहेत.

रहिवाशांना आवाहन:हे उद्यान आपल्या सर्वांच्या मालकीचे असून, काम सुरू असताना सर्व सभासदांनी आणि रहिवाशांनी लक्ष देऊन इस्टिमेटनुसार दर्जेदार काम करून घेणे आवश्यक आहे ..... प्रकाश मुंडे सभासद.

# हंगामी वसतिगृहाच्या खोट्या तक्रारी देणाऱ्याविरुद्ध कारवाई करा

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

ऊसतोड मजुरांची मुले शिक्षणा पासुन वंचीत राहु नयेत म्हणुन राज्य शासनाने त्यांच्या सोई, सुविधेसाठी हंगामी वस्तीगृहाची योजना राबवली आहे. त्यामुळे गोर-गरीबांची मुले शिक्षण घेत आहेत. परंतु काही लोकांना हे पाहवत नाही.त्यामूळे त्यांनी खोटे, नाटे व बिनबुडाचे आरोप करून अधिकाऱ्यांची दिशाभूल करून आसे वस्तीगृह बंद पाडण्यासाठी काही मंडळी खोट्या तक्रारी देत आहेत..आशा खोट्या तक्रारी देणाऱ्या विरुद्ध चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी ए आय एम आय एम चे तालुका अध्यक्ष आबूतालेब इमामदार यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे .

ज्या गावात वसतिगृह चालते त्या गावातील एकाही नागरीकांनी तक्रार दिलेली नाही. किंवा शाळा व्यवस्थापन समितीनेही तक्रारी दिलेली नाही. बाहेरच्या जिल्हयातील व तालुक्यातील लोक निराधार व खोटे आरोप करणाऱ्या तक्रारी देत आहेत. व अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करीत आहेत. यांचा बोलाविता धनी वेगळाच आहे.



या प्रकरणी चौकशी करून अश्या खोट्या तक्रारी देणाऱ्याविरुद्ध कडक कार्यवाही करावी अशी मागणी ए आय एम आय एम चे तालुका अध्यक्ष अबुतालेब वलियोद्दीन इनामदार यांनी केली आहे. निवेदनाच्या प्रति राज्य प्रकल्प संचालक,मुंबई.जिल्हाधिकारी,मुख्य कार्यकारी अधिकारी,व शिक्षणाधिकारी साहेब (प्रा.) यांना देण्यात आल्या आहेत.

# जि.प.नांदेड शिक्षणाधिकारी प्राथमिक यांच्या कार्यालयात शिक्षकांचा ठिय्या

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

शिक्षक पदोन्नतीची प्रक्रिया नियमबाह्य पद्धतीने राबविण्यात येत असल्यामुळे तसेच संघटना व शिक्षक यांच्या आक्षेपाचा कोणताही विचार न करता पदोन्नतीची प्रक्रीया राबविण्यात येत असल्याने संतप्त शिक्षक हे शिक्षणाधिकारी यांच्या दालनासमोर ठिय्या मांडला..

१) पूर्वलक्षी प्रभावाने पदोन्नतीची यादी प्रकाशित करणे.

२) Minimum qualification TET/ CTET असताना तोच अंतिम निकष समजून ग्राह्य धरणे सेवाज्येष्ठता तसेच व्यावसायिक आर्हता विचारात न घेता नियमबाह्य पदोन्नतीची प्रक्रिया सुरू करणे..

३) NCTE Delhi,मा.न्यायालयीन मार्गदर्शक तत्वे ,आदेश डावलून व शासनाचे कोणतेही स्पष्ट मार्गदर्शन नसतानाही पदोन्नतीची प्रक्रिया घाईघाईत राबविणे..

४) CTET-202६ परीक्षा नुकतीच पार पडलेली असून येत्या आठवडाभरात निकाल अपेक्षित असून



त्यांचाही समावेश पदोन्नती प्रक्रीयेत करणेची मागणी करण्यात आली..

५) शिक्षक पदोन्नतीतीची प्रक्रिया मा.सुप्रिम कोर्टाच्या आदेशानुसार राबविण्यात यावी कोणत्याही सेवाज्येष्ठता शिक्षकावर अन्याय होऊ नये यासाठी प्रशासनाने लक्ष द्यावे.

# पाथर्डी बाजार समितीत झालेल्या गैरव्यवहारची चौकशीची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समितीतील कारभारावर गंभीर आरोपांचा भडका उडाला असून बेकायदेशीर कामे, आर्थिक गैरव्यवहार आणि तक्रार करणाऱ्यांना धमकावण्याचे प्रकार सुरू असल्याचे निवेदनातून समोर आले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात गोरख पांडुरंग ढाकणे (रा. पाथर्डी) यांनी सहाय्यक निबंधक, सहकार संस्था पाथर्डी यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर केले आहे.निवेदनात नमूद केल्याप्रमाणे बाजार समितीत खालीलप्रमाणे गंभीर गैरप्रकार सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे -




बेकायदेशीर भूखंड वाटप व ट्रान्सफरमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार
गाळे भाड्यांमध्ये अनियमितता व नियमबाह्य निर्णय
मार्केट फीची जादा व बेकायदेशीर वसुली
खोटे खर्च दाखवून बनावट बिलांची उभारणी प्रवास न करता भाडे (ढ-/ऊ-) काढणे
हॉटेलमध्ये न जाता बिल काढणे बांधकाम कामांमध्ये अनियमितता करून जादा बिल उचलणे
बेकायदेशीर बांधकामांकडे दुर्लक्ष
कामगारांकडून वैयक्तिक कामे करून घेणे
व्यापाऱ्यांकडून बेकायदेशीर वसुली व दबाव टाकणे
गाळे भाड्यातील पावत्यांमध्ये घोटाळे
अधिकृत पावत्या न देता वारंवार मार्केट फी वसुली मुसाफिर खर्च, जाहिरात खर्च आदींच्या नावाखाली निधीचा अपव्यय
कांदा शेडमधील घोटाळ्याचीही चौकशीची मागणी
बेकायदेशीर बांधकाम (पाथर्डी-तीसगाव परिसर) तपासण्याची मागणी
कर्मचाऱ्यांकडून वैयक्तिक कामे करून त्यांचे वेतन बाजार समितीतून काढणे


तसेच, बाजार समितीच्या चेअरमनकडून नियमबाह्य प्रस्ताव मंजूर करून आर्थिक फायदा करून घेतल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या गैरप्रकारांविरोधात कोणी तक्रार केल्यास चेअरमनकडून धमक्या दिल्या जात असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे, ज्यामुळे संबंधितांविरोधात बोलण्यास अनेकजण घाबरत असल्याचे निवेदनात नमूद आहे.या सर्व प्रकरणांची दखल घेऊन बाजार समितीचा कारभार स्पेशल ऑडिटद्वारे तपासावा व दोषींवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

दरम्यान, या प्रकरणामुळे पाथर्डी तालुक्यात मोठी खळबळ उडाली असून प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# डोरली येथे दुसऱ्या बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन

## उपस्थित राहण्याचे आयोजकांचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**हदगांव । प्रतिनिधी**



हदगाव तालुक्यातील डोरली येथे दुसऱ्या बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन रविवार दि. २२ मार्च रोजी करण्यात आले आहे. परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक अनिल शेळके यांनी केले आहे. या धम्म परिषदेच्या प्रमुख आयोजक म्हणून माजी जिल्हा परिषद सभापती अनिताताई हिंगोले (नांदेड) ह्या आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटन हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार बाबुरावजी कदम यांच्या हस्ते होणार असून प्रभू सावंत हे स्वागताध्यक्ष राहणार आहेत.

या कार्यक्रमाला मनीषभाऊ कावळे, दत्तात्रय शेळके, माधव दादा जमदाडे, गौतम कदम, विजयराव खडसे, प्रशांत भाऊ हिंगोले, निळू पाटील, संतोष हराळे, नगरसेवक लक्ष्मण काळबांडे, विजय दादा एडके, राष्ट्रपाल दादा सावतकर, महेंद्र भाऊ धोंगडे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहेत.

धम्म परिषदेचे प्रमुख व्याख्याते भीम टायगर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दादासाहेब शेळके असून त्यांचे विद्रोही व्याख्यान रात्री ७ वाजता होणार आहे. त्यानंतर रात्री ८.३० वाजता बुद्ध-भीम गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या सांस्कृतिक कार्यक्रमात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायिका धम्मदीक्षा वाहुळे (लातूर), व संतोष मंत्री (नांदेड) यांच्यात बुद्ध-भीम गीतांचा जंगी सामना रंगणार आहे.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संयोजन समितीमध्ये बाबासाहेब शेळके, प्रवीण कांबळे, रवी शेळके, सचिन शेळके, पप्पू शेळके, समाधान शेळके, सुनील शेळके, संदेश शेळके, सचिन हळदे, किशोर शेळके, राजपाल शेळके आदी कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.या धम्म परिषदेला परिसरातील बौद्ध बांधव व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक अनिल शेळके यांनी केले आहे.

# प्रेगाबालिन कॅप्सूल (नशेच्या गोळ्या)ची अवैध विक्री उघड

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथक व अन्न व औषध प्रशासनाच्या संयुक्त कारवाईत प्रेगाबालिन कॅप्सूलची अवैध विक्री करणाऱ्या मेडिकल चालकावर कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत सुमारे ७०,४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस उप अधीक्षक रामेश्वर व्यंजने यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. नांदेड शहरात काही मेडिकल चालक डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय नशा निर्माण करणाऱ्या गोळ्यांची विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार भाग्यनगरचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे, गुन्हे विभागाचे पोलीस निरीक्षक महेश माळी, पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख, नरेश वाडेवाले, पोलीस अंमलदार विशाल माळवे, गजानन किडे, विष्णू मुंढे, राहुल लाठकर, नागनाथ चापके, राहुल घुले, अदनान पठाण, अंकुश पठाण यांनी सापळा रचून तपास सुरू केला.




तपासादरम्यान राज कॉर्नर जवळील हनुमान फार्मा या मेडिकलवर बनावट ग्राहक पाठवून प्रिस्क्रिप्शनशिवाय गोळ्या विकल्या जात असल्याची खात्री करण्यात आली. आरोपी मेडिकल चालकाने १० गोळ्या २५० रुपयांना विक्री केल्याचे उघड झाले. त्यानंतर अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसह संयुक्त छापेमारी करण्यात आली. या छाप्यात १६०० प्रेगाबालिन कॅप्सूल जप्त करण्यात आल्या. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ७०,४०० रुपये असल्याचे सांगण्यात आले. संबंधित मेडिकल चालकाकडे या औषधांच्या खरेदी-विक्रीची कोणतीही वैध कागदपत्रे आढळून आली नाहीत.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. तसेच प्रिस्क्रिप्शनशिवाय अशा प्रकारच्या औषधांची विक्री करू नये, असे आवाहन भाग्यनगर पोलिसांनी केले आहे

## बोधन-बिलोली-मुखेड-लातुर रोड च्या मागणी साठी रेल्वे संघर्ष समिती लढा देणार नुतन कार्याध्यक्ष डॉ.सुभेदार व समितीचे अध्यक्ष दिलीप कोडगीरे मैदानात



दैनिक वादळ वार्ता
**मुखेड । प्रतिनिधी**

मागील अनेक वर्षा पासुन निजाम कालीन प्रस्तावीत बोधन-बिलोली-मुखेड-लातुररोड रेल्वेमार्गासाठी चार वेळा सर्व्हेक्षण करण्यात येऊन ही केंद्रिय रेल्वे मंत्रालय या कडे जाणीव पुर्वक दुर्लक्ष करत असल्याचा संताप व्यक्त केला जात हौता. अखेर रेल्वे प्रश्नावर मागील काही वर्षा पासुन पाठपुरावा करणारे दिलीप कोडगीरे ह्याच्या पुढाकाराने रेल्वे संघर्ष समितीची स्थापना करण्यात आल्या नंतर संघर्ष समिती सक्रिय झाल्या मुळे कॉग्रेस खा. रविंद्र चव्हाण यांनी संसदीय अधिवेशनात ह्या रेल्वे मार्ग तेलंगणा व महाराष्ट या दोन राज्याला जोडणारा व व्यापारा साठी महत्वाचा असल्याने हा रेल्वे मार्गाला मंजुरी देवुन निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी केल्या नंतर समितीला मिळणारा वाढता पाठींबा लक्षात घेता डॉ. सुभेदार, व दिलीप कोडगीरी यांनी पुढाकार घेतला असुन आता रेल्वे मार्गाला मंजुरी घेतल्या शिवाय माघार घेणार नसल्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# हडगाव तालुक्यातील हरडफ येथे 'अखंड हरिनाम सप्ताह' व 'श्रीमद् भागवत कथे'चे भव्य आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**हडगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील हरडफ येथे हनुमान मंदिर व विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात श्री रामनवमी आणि हनुमान जन्मोत्सवाचे औचित्य साधून 'अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व श्रीमद् भागवत कथा' महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा गुरुवार, २६ मार्च २०२६ ते गुरुवार, २ एप्रिल २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे.

धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल: सप्ताहाच्या काळात दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ८ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी १ ते ४ श्रीमद् भागवत कथा, सायंकाळी ५ ते ७ हरिपाठ आणि रात्री ८:३० ते १०:३० या वेळेत नामवंत कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत. विद्वान वक्त्यांची मांदियाळी:या महोत्सवात भागवत कथा प्रवक्ते म्हणून ह.भ.प. पंजाबराव महाराज चालगणीकर आपले विचार मांडणार आहेत. तसेच ज्ञानेश्वरी व्यासपीठाची धुरा ह.भ.प. कपिल महाराज कामारीकर सांभाळतील. सप्ताहात दररोज रात्री होणाऱ्या कीर्तन सेवेसाठी ह.भ.प. कपिल महाराज कामारीकर, ह.भ.प. पंकज महाराज (हिंगोली), ह.भ.प. शिवाजी महाराज पिंपळगावकर, ह.भ.प. नारायण महाराज (हिंगोली), ह.भ.प. आत्माराम शास्त्री आळंदीकर, ह.भ.प. प्रभु महाराज गोंधनी आणि ह.भ.प. संतोष महाराज पळसोणा यांसारख्या मान्यवर कीर्तनकारांना पाचारण करण्यात आले आहे.

काल्याचे कीर्तन व महाप्रसाद: कार्यक्रमाची सांगता गुरुवार, २ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. पंजाबराव महाराज चालगणीकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने होईल. कीर्तनानंतर उपस्थित भाविकांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्याचा लाभ हरडफ परिसरातील तसेच पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन समस्त गावकरी मंडळी, हरडफ यांच्या वतीने करण्यात आले आहे.




# नाईचाकुर येथील जिल्हा परीषद प्राथमिक शाळेच्या ७५ वा अमृत महोत्सव साजरा होणार मोठ्या उत्साहात

दैनिक वादळ वार्ता
**औसा । प्रतिनिधी**

उमरगा तालुक्यातील नाई चाकूर येथील जिल्हा परिषद शाळेच्या ७५ व्या अमृत महोत्सवी सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून ,

नाई चाकूर येथील जिल्हा परिषद शाळेने गेल्या ७५ वर्षापासून आपल्या शाळेच्या गुणवत्तेकडे ,शाळा स्वच्छतेकडे व विद्यार्थ्यांच्या शारीरिक व शैक्षणिक विकासाला चालना देत गेल्या ७५ वर्षापासून अनेक विद्यार्थी घडवण्याचं कार्य या शाळेने केले असून ,गेल्या ७५ वर्षात नाईचाकुर जिल्हा परिषद शाळेपासून अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणाची सुरुवात करत आपल्या गावच्या जिल्हा परीषद शाळेत शिक्षण घेउन अभ्यासू वृत्तीने अनेक विद्यार्थी मोठमोठ्या सरकारी सेवेत दाखल झाले आहेत ,याचं सगळं श्रेय हे नाई चाकूर येथील जिल्हा परिषद शाळेला असून




आजपर्यंत या जिल्हा परीषद शाळेने अनेक विद्यार्थी घडविण्याचे कार्य केले आहे, येणाऱ्या काळात विद्यार्थ्यांना शाळेच्या माध्यमातून शैक्षणिक व गुणवत्तापुर्वक शिक्षण देत आपल्या गावातील विद्यार्थी घडला पाहिजे या सदभावनेने ७५ वा अमृत महोत्सव सोहळा आयोजित केला आहे या सोहळ्यासाठी नवनिर्वाचीत जिल्हा परीषद सदस्य महेश देशमुख ,व पंचायत समिती सदस्या सुगलाबाई वामन मदने ,

यांच्या शुभहस्ते प्रभातफेरी उदघाटन करुन कार्यक्रमाला सुरुवात होणार आहे ,त्यानंतर अमृत महोत्सव व वर्धापण दिनानिमीत्त शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण सोहळा उदघाटक उमरगा तालुक्याचे आमदार प्रविनजी स्वामी ,मुख्यमंत्री बळीराजा पानंद रस्ते सहअध्यक्ष शरण बस्वराजजी पाटील ,व धाराशिव जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ मैनाक घोष ,

सह धाराशिव जिल्हा परीषद प्राथमिक शिक्षण अधिकारी

मा.श्री रविंद्र खंदारे यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण संपन्न होणार आहे ,जिल्हा परीषद नाईचाकुर येथील माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन होणार असुन अमृत महोत्सव माजी विद्यार्थी स्नेहसंमेलन अध्यक्ष मनुन प्रा डॉ दिलीप गरुड ,.मुख्याध्यापक एन आर गायकवाड , व उपशिक्षण अधिकारी भंडारा श्री राहुल बावासर ,यांच्या शुभहस्ते स्नेहसंमेलन उदघाटन होणार असुन ,नाईचाकुर येथील जिल्हा परीषद शाळेत अम्रत महोत्सव सांस्क्रतीक कार्यक्रम आयोजीत केला असुन कार्यक्रमाचे उदघाटक धाराशिव जिल्हा परीषद उपाध्यक्षा सौभाग्यवती .उषाताई रविंद्रजी गायकवाड ,तर प्रमुख पाहुने उमरगा पंचायत समिती सभापती

आकांक्षाताई चौगुले ,यांच्या हस्ते होणार आहे तरी या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थीत रहावे अस आवाहन जिल्हा परीषद शालेय समिती ,मुख्याध्यापक व आजी माजी विद्यार्थी व नाईचाकुर ग्रामस्थांनी केली आहे,

# वादळी वारा व गारांच्या पावसामुळे पिके आडवी; गावठाण फिडरचे पोल कोसळले

दैनिक वादळ वार्ता
**हाणेगाव । प्रतिनिधी**

हाणेगाव-रमतापूर उपकेंद्रांतर्गत गावठाण फिडर थ्री-फेस विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी काही महिन्यांपूर्वीच नवीन विद्युत लाईन व पोल उभारण्याचे काम करण्यात आले होते. मात्र हे काम पूर्ण होऊन अवघे सहा महिनेही उलटले नसताना वादळी वारा व गारांच्या पावसातच विद्युत पोल कोसळल्याची घटना समोर आली आहे.

रविवार, दि. १६ मार्च २०२६ रोजी सायंकाळच्या सुमारास परिसरात जोरदार वादळी वारा, गारांसह पाऊस झाला. या वादळामुळे येडूर खुर्द ते येडूर बु. रस्त्यालगत उभारलेले काही विद्युत पोल जमिनीवर कोसळले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र या प्रकारामुळे परिसरातील नागरिक व शेतकरी वर्गातून तीव्र संताप व्यक्त होत आहे.





दरम्यान, या वादळी पावसामुळे येडूर परिसरातील ज्वारी, खरबूज, टरबूज तसेच इतर हंगामी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांची पिके पूर्णतः आडवी पडल्याने आर्थिक फटका बसला असून नुकसान भरपाईची मागणी होत आहे.

केंद्र सरकारच्या योजनेअंतर्गत ग्रामीण भागात अखंड व स्थिर वीजपुरवठा देण्यासाठी मोठ्या निधीतून ही कामे करण्यात आली होती. काही महिन्यांपूर्वीच या कामांची पाहणी करून लवकरच सर्व गावांना २४ तास वीजपुरवठा मिळेल, असे सांगण्यात आले होते.

मात्र अवघ्या एका वादळी वाऱ्यातच पोल कोसळल्याने कामाच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.
कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून उभारलेले पोल इतक्या लवकर पडत असतील तर संबंधित काम निकृष्ट दर्जाचे झाले काय, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. भविष्यात अशा प्रकारामुळे जीवितहानी झाल्यास जबाबदार कोण, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. त्यामुळे या कामाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिक व शेतकरी वर्गातून होत आहे.

# कोरडवाहु शेती,अत्यल्प सिंचन, रोजगाराअभावी मजुरांचे स्थलांतर

## कुटुंबातील तरुण रोजगाराच्या शोधात शहरांकडे

दैनिक वादळ वार्ता
**किनवट । प्रतिनिधी**

किनवट तालुक्यातील तांड्यांवर राहणाऱ्या आदिवासी, बंजारा समाजाची अवस्था अत्यंत बिकट आहे. कांही मजूर वीटभट्ट्या, ऊस कारखाने आणि शहरांमधील घरकामात जुंपल्या गेलेल्या या समाजाला हक्काचा विकास कधी मिळणार, हा मुख्य प्रश्न आहे. प्रशासकीय अनास्था उदासीनता यामुळे तालुका आज 'स्थलांतराचा तालुका' म्हणून ओळखला जात आहे. जर वेळेत पावले उचलली नाहीत, तर येणाऱ्या जी. प. पंचायत समीती निवडणुकीत गावागावात फक्त कुलपेच पाहायला मिळतील.
ताब्यात घेऊन एमआयडीसी क्षेत्र जाहीर केले असले, तरी त्या ठिकाणी अद्याप कोणताही मोठा उद्योग उभारलेला नाही. त्यामुळे स्थानिक तरुणांना रोजगाराची संधी मिळत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. किनवट तालुक्यात शेती हा प्रमुख व्यवसाय असला, तरी सिंचनाची सुविधाअत्यल्प आहे. अनेक बंधारे प्रत्यक्षात ते काही कोरडे पडलेले आहेत. विहीर शेतकऱ्यांना त्याचा अपेक्षित लाभ मिळत नाही.
परिणामी शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबातील तरुण रोजगाराच्या शोधात शहरांकडे वळत आहेत. पालकांच्या या सततच्या स्थलांतराचा परिणाम मुलांच्या शिक्षणावरही होत असून अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित होत आहे. त्यामुळे बेरोजगारी आणि गरिबीचे दुष्टचक्र अधिकच गडद होत असल्याचे चित्र किनवट तालुक्यात दिसून येत आहे.
किनवट तालुक्याचे नाव राजकीय व सामाजिक पटलावर वारंवार चर्चेत येत असले, तरी तालुक्यातील अनेक तांडे, वाडी-वस्त्या आणि गावांमधील वास्तव अत्यंत गंभीर आहे. कोरडवाहू शेती, अत्यल्प सिंचन व्यवस्था आणि रोजगाराच्या अभावामुळे हजारो कुटुंबे उदरनिर्वाहासाठी आपली घरे सोडून स्थलांतर करण्यास मजबूर झाली आहेत.
तालुक्यातील अनेक आदिवासी तांडे आणि गावांमधील नागरिक दिवाळीपासूनच घरांना कुलूप लावून शेजारील तेलंगणा राज्यासह औरंगाबाद, पुणे व मुंबईसारख्या शहरांकडे मजुरीसाठी जात आहेत. परिणामी अनेक ठिकाणी तांडे आणि घरे ओस पडल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.
दरम्यान, सरकार व निवडणूक आयोगाकडून शंभर टक्के मतदानासाठी जनजागृती केली जात असली, तरी उदरनिर्वाहासाठी गाव सोडून गेलेला वंचित मजूर वर्ग मतदानासाठी परत येणार का, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. मजुरांच्या स्थलांतरामुळे स्थानिक व्यापारावरही मोठा परिणाम झाला आहे. गावातील बाजारपेठा ओस पडल्या असून व्यापाऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे.

# ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या परिसरातील

## सातारा गावाचे आधुनिक शेतीकडे वाटचाल

दैनिक वादळ वार्ता
**पळसगांव । प्रतिनिधी**

राष्ट्रीय उद्यान ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या परिसरातील सातारा गावाने आधुनिक शेतीकडे वाटचाल करत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.प्रगतिशील शेतकरी विनोद बिरजे यांनी १७ एकर करडई पिकावर ड्रोनच्या साहाय्याने औषध फवारणी करून आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा यशस्वी प्रयोग केला.ड्रोन फवारणीमुळे पारंपरिक पद्धतीच्या तुलनेत अत्यल्प वेळात काम पूर्ण झाले.या प्रक्रियेत सुमारे ३० टक्के रासायनिक औषधांची बचत झाली,तर तब्बल ९० टक्के पाण्याची बचत झाल्याचे विनोद बिरजे यांनी सांगितले.परिणामी उत्पादन खर्च कमी होण्यास मदत होऊन पर्यावरणपूरक शेतीला चालना मिळणार आहे.या उपक्रमामुळे गावातील इतर शेतकऱ्यांमध्ये आधुनिक शेतीबाबत उत्साह निर्माण झाला असून भविष्यात



ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.आदर्श व स्मार्ट गाव सातारा येथील सरपंच गजानन गुळधे यांनी या प्रयोगाचे कौतुक करत,हा उपक्रम सातारा गावांसाठी आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची सुरुवात असून गावांच्या विकासासाठी महत्त्वाचा टप्पा ठरेल,असे मत व्यक्त केले.तसेच 'सलाम किसान' च्या यशस्वी आयोजनाबद्दल त्यांनी आभार मानले.या प्रसंगी आदर्श गाव सातारा येथील व्हिजिटर कॅम्प मधील पाहुण्यांनी ड्रोन तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक पाहिले. कार्यक्रमाला सहाय्यक कृषी अधिकारी बळीराम येवले,मंडळ कृषी अधिकारी आर.बी.सोनवणे, 'सलाम किसान'चे प्रबंधक सुमित मुंगले तसेच ड्रोन पायलट मुकेश नागदेवते उपस्थित होते. सातारा गावातील हा प्रयोग ग्रामीण भागात तंत्रज्ञानाधारित, जलसंधारणाभिमुख आणि आधुनिक शेतीचा नवा मार्ग दाखवणारा ठरत असून भविष्यात अशा उपक्रमांमुळे शेती अधिक कार्यक्षम,किफायतशीर आणि शाश्वत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# नाथसंजीवन महोत्सवासाठी सावरगाव सज्ज भक्ती,व्यवस्थापन आणि एकतेचा देखणा संगम

## भाविकांच्या सेवेसाठी देवस्थान ट्रस्ट-ग्रामस्थ-स्वयंसेवकांचा महाराष्ट्रभर पोहोचणारा प्रेरणादायी संदेश

दैनिक वादळ वार्ता
**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान, सावरगाव येथे होणाऱ्या 'नाथ संजीवन समाधी महोत्सव २०२६' निमित्त संपूर्ण परिसर भक्तिमय उत्साहाने उजळून निघाला असून महोत्सवासाठी जय्यत तयारी पूर्ण झाली आहे. १४ मार्च ते १९ मार्च दरम्यान पार पडणाऱ्या या भव्य सोहळ्यासाठी देवस्थान ट्रस्ट, ग्रामस्थ आणि स्वयंसेवकांनी एकत्र येत उत्कृष्ट नियोजनाचे उदाहरण घालून दिले आहे.महोत्सवात सहभागी होणाऱ्या हजारो भाविकांच्या सोयीसाठी निवास, स्वच्छ पिण्याचे पाणी, सुयोग्य वाहतूक व्यवस्था, आरोग्य सेवा आणि कडक सुरक्षा यांची बारकाईने आखणी करण्यात आली आहे. मंदिर परिसर आकर्षक सजावट, स्वच्छता आणि प्रकाशयोजनेने उजळून निघाला असून संपूर्ण गड परिसर भक्तांच्या स्वागतासाठी सज्ज झाला आहे.महोत्सवातील निशाण प्रस्थान, कावड आगमन, महाआरती, जलाभिषेक आणि महापूजा यांसारखे प्रमुख धार्मिक विधी सुरळीत पार पडावेत यासाठी स्वयंसेवकांची नेमणूक करण्यात आली आहे. भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी मार्गदर्शन केंद्र उभारण्यात आली असून प्रत्येक ठिकाणी नियोजनबद्ध व्यवस्था दिसून येत आहे.देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांना शिस्त पाळण्याचे, स्वच्छता राखण्याचे आणि प्लास्टिकमुक्त महोत्सवासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.
विशेषतः कावडधारकांसाठी वेळेचे काटेकोर नियोजन करण्यात आले असून नियमांचे पालन करण्यावर भर देण्यात आला आहे.महाराष्ट्राला प्रेरणा देणारा संदेश या महोत्सवाच्या निमित्ताने देवस्थान ट्रस्ट, ग्रामस्थ आणि स्वयंसेवकांनी एकजुटीने दिलेला संदेश महाराष्ट्रभर पोहोचत आहे-सुसंघटित नियोजन, सामूहिक जबाबदारी आणि श्रद्धेची एकजूट असेल, तर कोणताही धार्मिक सोहळा भव्य आणि यशस्वी होऊ शकतो.एकूणच, सावरगाव येथे भक्ती, सेवा आणि व्यवस्थापन यांचा सुरेख संगम पाहायला मिळत असून 'नाथ संजीवन समाधी महोत्सव' हा केवळ धार्मिक सोहळा न राहता समाजाला एकत्र आणणारा प्रेरणादायी उत्सव ठरत आहे.




# संविधान जनजागृती झालीच पाहिजे-अजिनाथ राऊत



दैनिक वादळ वार्ता
**भूम । प्रतिनिधी**

सन २०२४ -२५ हे वर्ष भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्याचे शासन निर्णयानुसार जाहीर करण्यात आलेले आहे .शासनाने यासंबंधी वर्षभराचा कृती आराखडा व वार्षिक वेळापत्रकानुसार संविधानाविषयी जाणीव जागृती निर्माण करण्याचे व त्यासंबंधी वेगवेगळे कार्यक्रम घेण्याचे सांगितले होते ;परंतु या कार्यक्रमांची प्रत्येक ठिकाणी अंमलबजावणी होते किंवा नाही हे पाहण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये भरारी पथकाची निर्मिती केलेली आहे . सदर भरारी पथकाने भेट दिली व वर्षभराच्या कार्यक्रमाचा आढावा घेतला तसेच पुढील कार्यक्रमाची दिशा सांगितली .कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी नाही झाली तर संबंधित शाळा प्रमुखांवर कार्यवाही करण्याचे अधिकार आहेत असे सांगितले .नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टीस संघटनेचे जिल्हाध्यक्ष आदिनाथ राऊत तसेच तालुका अध्यक्ष श्याम पालके यांनी भेट देऊन संपूर्ण शासन निर्णयांची माहीती दिली .कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक तात्या कांबळे होते यावेळी मान्यवरांचा बुके व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्तात्रय गुंजाळ यांनी केले ;तर आभार प्रदर्शन पायघन यू पी यांनी केले .कार्यक्रमाला सर्व शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते

# बाबु कोकाट यांचा जिल्हाधिकारी सह सीईओ जितीन रहमान हस्ते सन्मान

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

कृषी क्षेत्रात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी शासनाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या महाविस्तार एआय प नोंदणी मोहिमेत बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील ठाकर आडगाव येथील कृषीमित्र सी.एस.सी चालक बाबु (त्रिंबक कोकाट) यांनी उल्लेखनीय कामगिरी करत मराठवाडा विभागासह बीड जिल्ह्यात १०० टक्के महाविस्तार प नोंदणी मध्ये प्रथम क्रमांक मिळवला आहे.या उल्लेखनीय कामगिरीबद्दल बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन सर तसेच जिल्हा परिषद बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) जितीन रहमान सर यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन त्रिंबक कोकाट यांचा गौरव करण्यात आला.या सन्मानामुळे ठाकर आडगाव शेतकरी मित्र परिवार यांच्या मधे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.
महाविस्तार एआय पच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेतीसंदर्भातील मार्गदर्शन, हवामानाचा अंदाज, पीक व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रण, तसेच आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती मोबाईलवर सहज उपलब्ध होत आहे.
या पची जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी नोंदणी करावी यासाठी त्रिंबक कोकाट यांनी गाव परिसर मध्ये जनजागृती केली.आडगाव शिवारातील ऊस तोड चालू असलेल्या ठिकाणी शेतात जाऊन त्या शेतकरी बांधवांना शासनाचे नवीन आलेलं महाविस्तार एआय प इंस्टॉल करून दिले तसेच त्या मधील माहिती समजावून गावामध्ये शेतीशाळा घेत उपस्थित शेतकरी यांना प इन्स्टॉल करून देत असत व त्यामधील माहिती प्रत्येक शेतकऱ्यांना त्यांच्या भाषेमध्ये समजावून सांगत आहेत तसेच न्युज पेपरवर आकाशवाणी केंद्र वर व्हॉट्सप ब्रॉडकास्ट द्वारे शेतकरी बांधवापर्यंत हे अँप बाबत माहिती दिली गेली त्या मुळे आज ठाकर आडगाव या गावाने महाविस्तार एआय'प नोंदणी बाबत १०० टक्के पूर्ण नोंदणी करण्याचे काम कोकाट यांनी मराठवाडा विभाग तसेच जिल्ह्यातून प्रथम क्रमांक वर टॉप वर आणले त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे मोठ्या प्रमाणावर शेतकरी या पशी जोडले गेले आणि मराठवाडा विभागात अव्वल स्थान मिळवणे शक्य झाले.
या यशामागे कृषी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले.जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे,कृषी उपसंचालक जाधवर साहेब,तंत्रज्ञ अधिकारी मगर साहेब कृषी विज्ञान केंद्र खामगावचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. हनुमान गरुड, तसेच तालुका कृषी अधिकारी सचिन गिरी सूरपम सर बीड जिल्हा सीएससी व्यवस्थापक दिनेश जाधव सर,जातेगांव मंडळ कृषी अधिकारी श्री.वैभव डोंगरे सर,उपकृषी अधिकारी श्री.श्रीराम पवार सर,सहाय्यक कृषी अधिकारी श्री प्रकाश वाघमारे सर,आत्मा विभागाचे पठाण सर, घोडके सर, यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य मोलाचे ठरले.या सन्मानाबद्दल त्रिंबक कोकाट यांनी सर्व शेतकरी बंधू,मित्रपरिवार तसेच कृषी विभागातील अधिकारी व सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.पुढील काळातही अधिकाधिक शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडून शेती अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077